दि. 2 /7 /2024

शैक्षणिक वर्ष 2024-25 शिष्यवृत्ती.

शैक्षणिक वर्ष 2024-25 साठी सुभद्राबाई शिक्षण निधी मुंबईकडे शिष्यवृत्तीसाठी अर्ज करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तसेच आर्थिक मदतीसाठी अर्ज करू इच्छिणाऱ्या संस्थांसाठी माहितीपत्रक.

- ही शिष्यवृत्ती केवळ रत्नागिरी किंवा सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मूळ रहिवासी असलेल्या विद्यार्थ्यांसाठीच आहे.

- विद्यार्थी दहावी उत्तीर्ण होऊन सरकार मान्य अशा कोणत्याही अभ्यासक्रमात शिकत असला पाहिजे.

- विद्यार्थी आर्थिक दृष्ट्या गरजू असणे आवश्यक आहे.

- जात तसेच धर्म याबद्दल कोणतीही अट नाही.

- विशिष्ट गुणांची अट नाही.

- शिष्यवृत्तीची रक्कम किमान 5000 रुपये आहे.

- शिष्यवृत्तीसाठी ऑनलाइन अर्ज भरायचा आहे त्यासाठी लिंक या पत्रकाच्या शेवटी आहे. ही लिंक सर्व प्रकारच्या अर्जांसाठी आहे. तेथे स्टुडन्ट स्कॉलरशिप हा फॉर्म भरायचा आहे. त्यासाठी
    - गुणपत्रक
    - फी पावती अथवा बोनाफाईड सर्टिफिकेट
    - शिधापत्रिका (रेशन कार्ड)
    - कुटुंबातील कमावणाऱ्या सर्व व्यक्तींचा 2023-24 या वर्षातील उत्पन्न दाखला
    - विद्यार्थी ज्या शाळेत शिकत होता त्या शाळेतील दोन शिक्षकांची स्व हस्ताक्षरातील शिफारस पत्रे. ही शिफारस पत्रे शाळेच्या लेटरहेडवर असली पाहिजेत व शेवटी शिक्षकाचे संपूर्ण नाव संपर्क क्रमांक व स्वाक्षरी असली पाहिजे.

  ही सर्व कागदपत्रे pdf या प्रकारात लागतील.

- शैक्षणिक खर्च जास्त असेल तर अधिक रकमेची कर्जाऊ शिष्यवृत्ती मिळू शकते त्यासाठी स्टुडन्ट स्कॉलरशिप हा फॉर्म न भरता स्टुडन्ट लोन स्कॉलरशिप हा फॉर्म भरावा.
- विद्यार्थी अपंग असल्यास विद्यार्थ्यांचे पालक सैन्यात आजी अथवा माजी असल्यास विद्यार्थ्यांचे पालक शिक्षक आजी अथवा माजी असल्यास किंवा विद्यार्थी जिल्हास्तरीय खेळाडू असल्यास त्याची प्राधान्याने निवड होते

- संस्थांसाठी शाळा अंगणवाडी व सतीग्रह वाचनालय यासाठी स्वतंत्र फॉर्म आहेत त्याप्रमाणे अर्ज करावा

- अर्ज करण्याची शेवटची तारीख 30 सप्टेंबर 2024 ही आहे

- अपूर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत

- अर्जाची प्राथमिक छाननी झाल्यानंतर त्यात निवडलेल्या विद्यार्थ्यांना मुलाखतीसाठी बोलाविले जाईल निवड झालेल्या विद्यार्थ्यांची नावे मुलाखतीची तारीख वेळ व ठिकाण या वेबसाईटवर 15 ऑक्टोबर 2024 नंतर लावली जातील विद्यार्थ्यांनी 15 ऑक्टोबर नंतर याकरिता दररोज वेबसाईट पहावी

- मुलाखतीत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती धनादेशाने म्हणजे चेकने दिली जाईल विद्यार्थ्याचे बँकेत खाते असणे आवश्यक आहे व ते ऍक्टिव्ह असणे देखील गरजेचे आहे मुलाखतीस गैरहजर राहिलेल्या मुलांची शिष्यवृत्ती रद्द होईल

- संख्येच्या धोरणानुसार सख्ख्या भावंडा पैकी एकाला शिष्यवृत्ती मिळू शकेल

- शिष्यवृत्ती ची यादी जाहीर झाल्यानंतर शिष्यवृत्ती न मिळालेल्या विद्यार्थ्यांनी कृपया संस्थेच्या पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधून नाहीये.

- ऑनलाइन अर्ज करण्यासाठी आवश्यक असणारी तांत्रिक माहिती पीडीएफ स्वरूपात दिलेली आहे ती अर्ज भरण्याआधी जरूर पहावी.

- भरलेला अर्ज आणि सोबत जोडलेले कागदपत्र याची एक प्रत स्वतःजवळ ठेवावी. मुलाखतीसाठी निवड झाल्यास मुलाखतीला येताना ते कागदपत्र व त्याची मूळ प्रत म्हणजेच ओरिजनल डॉक्युमेंट सोबत आणाव्या.